श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

ऑगस्ट २०२५ | वर्ष – १३ अंक –८ | मासिक, पाने १२ | Regn.No. - MAHMAR/2022/86035

## भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर यांची ९५वी जयंती उत्साहात साजरी




संपूर्ण आयुष्य समाजाच्या सेवेसाठी अर्पण करणारे भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर यांची ९५वी जयंती दि. २९ जुलै २०२५ रोजी श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट, डेरवणच्या बहुउद्देशीय सभागृहात उत्साहाने साजरी झाली. या कार्यक्रमाला वाराणसी येथील बनारस हिंदू विद्यापीठाच्या अधिष्ठाता डॉ. बिंदा दत्तात्रय परांजपे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. दीपप्रज्वलन व ईशस्तवनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रशालेचे शिक्षक ओंकार तांबे यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. वालावलकर रुग्णालयाच्या वैद्यकीय संचालिका डॉ. सुवर्णा पाटील यांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन पाहुण्यांचे स्वागत केले.



प्रमुख पाहुण्या डॉ. बिंदा दत्तात्रय परांजपे दीपप्रज्वलन करताना




डॉ. बिंदा दत्तात्रय परांजपे यांचे स्वागत करताना
वैद्यकीय संचालिका डॉ. सुवर्णा पाटील

इंग्लिश मिडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी इंग्रजी, संस्कृत, जर्मन, स्पॅनिश भाषेत साहेबांबद्दलचे आपले मनोगत व्यक्त केले. यामध्ये इ. ९वीतील कु. ग्रीष्मा नांदोस्कर हिने साहेबांच्या जीवनातील निवडक प्रसंगांचे कथन करून गुरूंचे महत्त्व विशद केले. इ. ६वीतील कु. आराध्या तेटांबे व कु. मनुजा थत्ते यांनी संस्कृतमधून साहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू सांगत असताना दातृत्व, धीरत्व व उचितज्ञता या गुणांचे कथन केले आणि त्यांच्या हृद्य आठवणींना उजाळा दिला. इ. १०वीतील कु. चिन्मयी मोहिरे व इ. ५वीतील आरोही मोहिरे यांनी जर्मनमधून तर इ. १०वीतील ईश्वरी सुर्वे व इ. ६वीतील श्रीनिवास पवार यांनी स्पॅनिशमधून; वालावलकरसाहेब यांनी कोकणात गुरूंच्या नावाने एकमेवाद्वितीय संस्था स्थापन करून आम्हा कोकणवासीयांना उपकृत केले आहे अशी कृतज्ञता व्यक्त केली. तसेच समारंभाच्या प्रमुख पाहुण्या अधिष्ठाता डॉ. बिंदा परांजपे यांचे मूळ गाव राजापूर येथील देवाचे गोठणे हे असून एक कोकणची सुपुत्री बनारस हिंदू विश्वविद्यालयासारख्या जागतिक कीर्तीच्या संस्थेत अधिष्ठात्री हे बहुमानाचे पद भूषवित आहे, हे कोकणवासीयांसाठी अभिमानास्पद आहे असे आदरपूर्वक नमूद केले.

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टमधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी समर्थ नर्सिंग कॉलेजमधील कु. ओंकार जाधव, कु. मेघा उदेग व कु. साक्षी पवार या विद्यार्थ्यांनी प्रवेशादरम्यान पाहिलेली इतर कॉलेज व श्री समर्थ नर्सिंग कॉलेज यातील फरक विशेषत्वाने नमूद केला. इथे दिले जाणारे शिक्षण, सुसज्ज इमारती, सर्व सोयींनी युक्त रुग्णालय, विविध उपक्रम, याविषयी बोलत असताना समाधान व्यक्त केले. फिजिओथेरपीच्या कु. दुर्वा शिंदे हिने आपल्या मनोगतातून आता दिसणारे सुसज्ज, भव्यदिव्य सेवाभावी रुग्णालय सुरू करताना आलेल्या विविध अडचणी सांगितल्या. गुरूंवरील अटळ श्रद्धेमुळे या सर्व अडचणींवर मात करून रुग्णालयाची स्थापना कशी करण्यात आली व साहेबांनी गुरूंची इच्छा सत्यात उतरवली हे आपल्या मनोगतातून व्यक्त केले.

प्रशालेच्या संचालिका सौ. शरयू यशवंतराव यांनी आपल्या मनोगतातून साहेबांच्या विचारांचे पैलू मांडत असताना मिळालेले यश व कीर्ती ही माझी नसून निव्वळ माझ्या सद्गुरूंची आहे, हा त्यांचाच कृपाप्रसाद आहे, अशी सद्गुरुनिष्ठा जपणाऱ्या साहेबांची जयंती ही स्मरणरूपी प्रेरणा आहे व त्यांच्या कार्यातून शिकून आपणही आपल्या क्षमतेनुसार समाजासाठी योगदान द्यावे अशी भावना व्यक्त केली.

रुग्णालयाच्या संचालिका डॉ. सुवर्णा पाटील यांनी साहेबांच्या दातृत्वातून सर्व गोरगरिबांसाठी उपलब्ध करून दिलेल्या सोयी सुविधांचा आढावा घेतला. जे कार्य साकारलंय हे सर्व सद्गुरुभक्तीचे फळ आहे, त्यात माझं काही नाही, हे सर्व महाराजांचं आहे, म्हणून त्यांनाच मी ते अर्पण करतो अशी साहेबांची भावना होती असे आपल्या मनोगतातून व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या बनारस हिंदू विद्यापीठाच्या अधिष्ठाता डॉ. बिंदा परांजपे साहेबांच्या कार्याविषयी बोलत असताना, अर्जुन व कृष्ण यांचे समर्पक उदाहरण देत त्यांनी 'हिमालयातील तपस्वी' या चरित्रातून समजलेले साहेब व त्यांची सद्गुरू श्रीसहजानंदसरस्वती यांच्या प्रतीची गुरुभक्ती याविषयी विवेचन केले. समाजाच्या सर्वांगीण उत्कर्षासाठी तन-मन-धन खर्ची घालून आपल्या सर्वस्वाचे समर्पण करणारे हे व्यक्तिमत्त्व आहे. कीर्तीची अपेक्षा न ठेवता केवळ देत राहणारे, कर्मयोगावर श्रद्धा ठेवणारे आणि सेवेतच भक्ती मानणारे हे विनम्र व्यक्तिमत्त्व आजही प्रेरणादायी आहे. अनेक अडचणींवर मात करत असताना साहेबांनी घेतलेले कष्ट, त्यांनी केलेला विचार, त्यांचे नियोजन, हे सारे नव्या पिढीला कळले पाहिजे आणि म्हणून त्यांचे विस्तृत चरित्र लिहिलं गेलं पाहिजे अशी इच्छा त्यांनी प्रकट केली.

यानंतर शिक्षिका आदिती खांडेकर यांनी पाहुण्यांचे आभार मानले व कार्यक्रमाची सांगता 'वंदे मातरम्' गायनाने झाली.



*इ. ६वीतील कु. आराध्या तेटांबे व कु. मनुजा थत्ते यांनी संस्कृतमधून साहेबांच्या गुणांचे कथन केले आणि त्यांच्या हृद्य आठवणींना उजाळा दिला.*



*साक्षी पवार (जी.एन.एम., प्रथम वर्ष, समर्थ नर्सिंग कॉलेज) आपले विचार मांडताना*




*सौ.शरयू यशवंतराव, डॉ. सुवर्णा पाटील, प्रमुख पाहुण्या डॉ. बिंदा परांजपे, प्रि. तेजल सुर्वे, श्रीकान्त पराडकर, प्रि. चन्द्रशेखर एल.*



*स्वातंत्र्यवीरांना अभिवादन - डावीकडून श्री. श्रीकान्त पराडकर, डॉ. आनंद जोशी, डॉ. नेताजी पाटील, शरयू यशवंतराव, डॉ. बिंदा परांजपे, डॉ. सुवर्णा पाटील,*



*प्रशालेच्या संचालिका सौ. शरयू यशवंतराव साहेबांच्या विचारांचे पैलू मांडत असताना*



*रुग्णालयाच्या संचालिका डॉ. सुवर्णा पाटील आपले मनोगत व्यक्त करताना*



*प्रमुख पाहुण्या, बनारस हिंदू विद्यापीठाच्या अधिष्ठाता डॉ. बिंदा दत्तात्रय परांजपे आपले विचार मांडताना*



*श्रोतृवर्ग*

# लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे पुण्यस्मरण




डॉ. विभावरी बिडवे दीपप्रज्वलन करताना, सोबत डावीकडून डॉ. नेताजी पाटील, डॉ. मानसिंग घाटगे, प्रि. तेजल सुर्वे, शाळा संचालिका शरयू यशवंतराव




शाळा संचालिका शरयू यशवंतराव डॉ. विभावरी बिडवे यांचे स्वागत करताना

भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे पहिले आणि प्रबळ पुरस्कर्ते, ज्यांना ब्रिटिश अधिकाऱ्यांनी 'भारतीय असंतोषाचे जनक' म्हणून संबोधले त्या जहालवादी लोकमान्य टिळकांची पुण्यतिथी श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टच्या बहुउद्देशीय सभागृहामध्ये दि. १ ऑगस्ट २०२५ रोजी साजरी करण्यात आली. भारतीय विचार साधना प्रकाशनाच्या माजी विश्वस्त व संपादिका डॉ. विभावरी बिडवे यासमयी प्रमुख वक्त्या लाभल्या होत्या.

कार्यक्रमाच्या प्रारंभी लोकमान्य टिळक व स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमांना पुष्पांजली अर्पण करण्यात आली. तसेच सभागृहात दीप प्रज्वलन आणि सभामंचावरील लोकमान्य टिळक आणि श्रीसद्गुरू सहजानंदसरस्वती स्वामीमहाराज यांच्या प्रतिमांना वंदन करून सभेला सुरुवात झाली. प्रशालेतील शिक्षिका सोनाली जोशी यांनी प्रमुख वक्त्यांची ओळख करून दिली. शाळेच्या संचालिका शरयू यशवंतराव यांनी शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन डॉ. विभावरी बिडवे यांचे स्वागत केले.

प्रमुख वक्त्या डॉ. बिडवे यांनी आपल्या व्याख्यानात, लोकमान्य टिळकांनी स्वदेशी, सार्वजनिक उत्सव यामार्फत समाजाला संपूर्ण स्वराज्याकडे वळवत लोकशाहीसाठी आवश्यक वातावरण निर्माण केले, त्यांनी कायदेशीर मार्गाने लढलेले लढे, 'केसरी' आणि 'मराठा' मार्फत लोकशाहीच्या पायाभरणीसाठी जे समाजमन ढवळून काढलं, ज्याने ते लोकमान्य म्हणून मान्यता पावले, याबाबत विचार मांडून लोकमान्य टिळकांचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान अधोरेखित केले. लोकमान्य टिळक पुण्यतिथी हा राष्ट्रीय दिवस भारतीय संविधानाचा आत्मा समजून घेण्याचा एक अनमोल क्षण ठरला. डॉ. विभावरी बिडवे यांनी विद्यार्थी, शिक्षक, डॉक्टर व कर्मचारीवर्गाशी 'संविधान @७५' या विषयावर संवाद साधला. विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता निर्माण करीत संविधान म्हणजे नेमकं काय? असा प्रश्न उपस्थित करून संविधान हे केवळ कायद्याचे पुस्तक नाही, तर ते आपल्या देशातील लोक आणि राज्य यांच्यातील सामाजिक करार आहे असे सांगितले. संविधान ही एका सामाजिक क्रांतीची प्रक्रिया आहे, ज्यातून न्याय, समतावादी, बंधुभाव असलेले राष्ट्र घडते असे सांगत त्यांनी प्राचीन भारतीय राज्यव्यवस्थेपासून वेद, स्मृती, शांतिपर्व, कौटिल्य यांचं योगदान, तसेच प्राचीन गणराज्यांची परंपरा उलगडून दाखवली. लिच्छवी, शाक्य, कोसला यांसारख्या गणराज्यांचा दाखला देत, भारत हा लोकशाहीचा खरा जन्मदाता आहे, हे त्यांनी विद्यार्थ्यांना सचित्र समजावले.

न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या संविधानाच्या प्रस्तावनेत नमूद असलेल्या चार मूल्यांवर त्यांनी विशेष भर दिला. ही मूल्ये केवळ दस्तावेजापुरती मर्यादित नाहीत, तर ती आपल्या आचार-विचारात उतरली पाहिजेत. प्रस्तावना म्हणजे संविधानाचा आत्मा असून ती वाचताना आपल्याला एक सार्वजनिक जबाबदारीची जाणीव होते. यापुढे मूलभूत हक्कांबाबत विद्यार्थ्यांना सखोल माहिती देत स्वातंत्र्याचा, समानतेचा हक्क, धर्म आणि व्यक्तिगत स्वातंत्र्य, शोषणविरहित जीवन जगण्याचा अधिकार अशा विविध हक्कांबद्दल विद्यार्थ्यांना उदाहरणासहित त्यांनी समजावून सांगितले. स्वातंत्र्याला मर्यादा आहेत आणि त्या देशाच्या सार्वभौमत्वाच्या रक्षणासाठी आवश्यक असतात हे आवर्जून नमूद केले. त्याबरोबरच १९७५ मधील आणीबाणी, ४२वी घटनादुरुस्ती, संविधानाचा दुरुपयोग झाला तर काय होते, हे त्यांनी ठामपणे समजावले. परंतु याच संविधानात अंतर्भूत असलेल्या न्यायालयीन व्यवस्थेने अनेकदा हे हक्क पुन्हा परत मिळवून दिले, हे सांगून संविधानाचा त्यांनी गौरव केला.

'धर्मो रक्षति रक्षितः' या संस्कृत वचनाचा संदर्भ देत, आपण जर संविधानाचे पालन करू, तर तेच संविधान आपले रक्षण करेल असे उद्धृत केले. धर्म म्हणजे धर्म किंवा पंथ नव्हे, तर कर्तव्य, मूल्य, शिस्त आणि विवेक आहे हे सांगून भारतीय संविधान




*डॉ. विभावरी बिडवे आपले विचार व्यक्त करताना*

आधुनिक काळातील नवधर्मग्रंथ असल्याचे त्या म्हणाल्या. शेवटी, नागरिकांच्या कर्तव्यांचा विचार मांडत देशाचे रक्षण, स्त्रियांवरील अत्याचाराला प्रतिबंध, पर्यावरणाचे संवर्धन, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा स्वीकार आणि सार्वजनिक मालमत्तेचे जतन – ही सर्व मूलभूत कर्तव्ये भारतीयांनी अंगीकारली पाहिजेत, असे नम्रपणे स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या अखेरीस डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार उद्धृत केला – 'कितीही चांगले संविधान असले, तरी ते जर वाईट लोकांनी चालवले, तर ते वाईटच ठरेल आणि कितीही वाईट संविधान असले, तरी चांगले लोक ते चालवतील, तर ते यशस्वी ठरेल.'

हा विचार विद्यार्थ्यांच्या मनावर खोलवर रुजवत विद्यार्थ्यांना संविधानाच्या आदर्शांना जीवनात अंगीकारण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाची सांगता श्रोत्यांच्या शंका निरसनाने आणि 'वंदे मातरम्' गायनाने झाली. या व्याख्यानासमयी शाळेच्या संचालिका शरयू यशवंतराव, रेडिऑलॉजिस्ट डॉ. नेताजी पाटील, मेडिकल कॉलेजचे प्राचार्य डॉ. मानसिंगराव घाडगे, नर्सिंग कॉलेजच्या प्राचार्या तेजल सुर्वे, फिजिओथेरपी कॉलेजचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर आदी मान्यवर उपस्थित होते. हे व्याख्यान विद्यार्थ्यांच्या मनात संविधानाबाबत आत्मियता आणि जबाबदारीची जाणीव निर्माण करणारे ठरले.

### प्रमुख वक्त्यांचा परिचय

*डॉ. विभावरी बिडवे या पुण्यातील सिव्हिल आणि कौटुंबिक न्यायालयांमध्ये कार्यरत वकील असून त्या सामाजिक व बौद्धिक क्षेत्रातही सक्रिय आहेत. 'भारतीय विचार साधना' या मासिकाच्या त्या विश्वस्त व संपादक असून, समाज–न्याय व संविधानविषयक प्रश्नांवर त्यांनी अनेक दैनिकांमध्ये लेखन केले आहे. 'महिला आणि कायदे' या विषयावर त्या रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी व राष्ट्रीय महिला आयोगाच्या नेतृत्व विकास कार्यक्रमांत प्रशिक्षक म्हणून कार्यरत आहेत.*

*एक कुशल लेखिका म्हणून त्यांनी संविधान, कायदेशीर हक्क, तसेच समाजसुधारकांच्या चरित्रांवर पुस्तके लिहिली आहेत आणि काही महत्त्वाची पुस्तके भाषांतरितही केली आहेत. त्या 'सुमंत्र' या बालकांमधील शिकण्याच्या अडचणींवर काम करणाऱ्या संस्थेच्या संस्थापक सदस्य असून 'भारतीय स्त्री शक्ती जागरण' या संस्थेसोबत त्यांनी लैंगिक समानता व कायदेशीर हक्कांवर जनजागृती कार्यक्रम यशस्वीपणे राबवले आहेत.*

*त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना 'वुमन अचिव्हर २०२१' हा पुरस्कार तसेच 'कै. विष्णुनाथ नरवणे पुरस्कार' भारतीय नागरिकत्व दुरुस्ती कायद्यासंदर्भातील साहित्य लेखनासाठी प्राप्त झाला आहे.*




*डावीकडून प्रि. चन्द्रशेखर एल., डॉ. श्रीहरी हसबनीस, शरयू यशवंतराव, डॉ. विभावरी बिडवे, डॉ. मानसिंग घाटगे, डॉ. आनंद जोशी, डॉ. नेताजी पाटील, श्रीकांत पराडकर*

# भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयात महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा २७ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा




*डॉ. अरविंद यादव, डॉ. मानसिंग घाटगे, अद्यापक वर्ग आणि वैद्यकीय रुग्णालयाचे विद्यार्थी*

दि. १० जून २०२५ रोजी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिकचा २७वा वर्धापनदिन भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय, डेरवण तसेच समर्थ नर्सिंग कॉलेज, कासारवाडी व कॉलेज ऑफ फिजिओथेरपी यांच्या संयुक्त विद्यमाने उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी नऊ वाजता डीन डॉ. मानसिंगराव घाटगे यांच्या हस्ते ध्वजारोहणाने झाली. या वेळी सर्व विभागांचे प्रमुख तसेच समर्थ नर्सिंग कॉलेजच्या प्राचार्या व फिजिओथेरपी कॉलेजचे प्राचार्य उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीत तसेच विद्यापीठाची प्रार्थना म्हणण्यात आली. यानंतर विद्यार्थी तसेच शिक्षकांनी विद्यापीठाच्या गौरवशाली वाटचालीबद्दल माहिती दिली. या विशेष दिवशी वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. परिसरामध्ये विविध प्रकारची औषधी वनस्पती व फळझाडे लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. या वृक्षारोपणाच्या कार्यक्रमामध्ये विद्यार्थी, शिक्षक वर्ग, अधिकारी वर्ग उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यापीठाच्या आरोग्यसेवा क्षेत्रातील योगदानाचे कौतुक करण्यात आले आणि भविष्यातील कार्यामध्ये अधिक जोमाने सहभागी होण्याचा संकल्प करण्यात आला.



*डॉ. मानसिंग घाटगे, डॉ. अरविंद यादव आणि वैद्यकीय रुग्णालयाचे विद्यार्थी वृक्षारोपण करताना*

# एसव्हीजेसीटी शैक्षणिक संकुलातील विद्यार्थ्यांसाठी 'के.जी.' ते 'पी.जी.' उपक्रम



*'के.जी. ते पी.जी.' कार्यक्रमात सहभागी झालेले विद्यार्थी, डॉक्टर्स, नर्सेस, आहारतज्ज्ञ आणि फिजिओथेरपिस्ट*

भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, डेरवण; श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट इंग्लिश माध्यम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजच्या संयुक्त विद्यमाने के.जी. ते पी.जी. ह्या संकल्पनेतून पुढील १५ वर्षांसाठी वय वर्षे ३ ते २२ वर्षांच्या बालवाडी ते उच्च शिक्षित विद्यार्थ्यांचे शारीरिक वजन, उंची मापन आणि आहार, व्यायाम विषयावरील मार्गदर्शन केले जाणार आहे.

आजची जीवनशैली, खाण्यापिण्याच्या सवयी आणि कामाचा ताण ह्यामुळे आजारांचे प्रमाण वाढत आहे. आणि त्याचे पर्यवसान चाळीशीनंतर मधुमेह-उच्च रक्तदाब-हृदयरोग अशा आजारांनी ग्रासले जाण्यात होत आहे. उत्तम आरोग्यासाठीची सुरुवात लहान वयातच झाली पाहिजे, ही यामागची संकल्पना आहे. त्यामुळे पुढील पिढी निरोगी, सशक्त आणि सजग होईल. या प्रकल्पांतर्गत लहान मुलांपासून तरुणांपर्यंत आरोग्य शिक्षण, आणि जीवनशैलीबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे.

विद्यार्थ्यांच्या शरीरातील चरबीचे आणि स्नायूंचे प्रमाण, हाडांची मजबुती, आहारातील विविधता, पोषणाविषयीची जागरूकता, शारीरिक व्यायाम व योग्य आसनशास्त्र (Ergonomics) यांचे सखोल ज्ञान दिले जाणार आहे. TANITA (जपान) या आधुनिक वजन काट्याच्या साहाय्याने शरीरातील चरबीचे प्रमाण मोजले जाईल. विद्यार्थ्यांच्या दैनंदिन आहाराचा अभ्यास त्यांच्या डब्यातील पदार्थ व २४ तासांच्या आहार नोंदींच्या आधारे केला जाईल.

अभ्यासामुळे लहान वयातच लठ्ठपणा, कूपोषण व इतर जीवनशैलीशी संबंधित आजारांचा धोका ओळखणे व त्यासाठी वेळेवर उपाययोजना करणे शक्य होणार आहे. विद्यार्थ्यांसोबत पालकांसाठीही पोषणविषयक जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.

अभ्यास प्रामुख्याने एसव्हीजेसीटी शाळेतील आणि कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांवर आधारित असून विद्यार्थ्यांना व पालकांना पोषण व आरोग्य शिक्षण दिले जाणार आहे.

या अभ्यासाचे नेतृत्व डॉ. सुवर्णा पाटील (प्रमुख संशोधक) करत असून शरयू यशवंतराव आणि प्राचार्य वर्ग, डॉ. चंद्रशेखर (फिजिओथेरपी), बालरोग तज्ज्ञ डॉ. पार्वती हळबे, डॉ. अनिल कुरणे, डॉ. अंकिता सुर्वे, आहारतज्ज्ञ मनाली केळकर आणि दृष्टी पटेल हे सहभागी आहेत.



*'के.जी. ते पी.जी.' कार्यक्रमात सहभागी झालेले विद्यार्थी, डॉक्टर्स, नर्सेस, आहारतज्ज्ञ आणि फिजिओथेरपिस्ट*



# ‘स्पंदन २०२५’ राज्यस्तरीय सांस्कृतिक युवा महोत्सवात समर्थ नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा उत्कृष्ट सहभाग




*वाद्यवादन स्पर्धेत तिसऱ्या क्रमांकचे बक्षीस स्वीकारताना सोहम खांबे (बी.एससी.नर्सिंग, प्रथम वर्ष)*



*पेटीवादन स्पर्धेत तिसऱ्या क्रमांकचे बक्षीस स्वीकारताना गौरव रावणंग (बी.एससी.नर्सिंग, प्रथम वर्ष)*

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या वतीने आयोजित ‘स्पंदन २०२५’ या राज्यस्तरीय सांस्कृतिक युवा महोत्सवात समर्थ नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनीदेखील मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला होता. हा महोत्सव विविध आरोग्य शिक्षण संस्थांतील विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आला होता. यामध्ये नर्सिंग, एमबीबीएस, बीएएमएस, बीएचएमएस, फिजिओथेरपी इत्यादी शाखांतील विद्यार्थी सहभागी झाले.

या महोत्सवात वादविवाद स्पर्धा, नृत्य, वाद्यवादन, एकांकिका, गायन, नाट्य, आणि इतर कला अशा विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. बारामती येथील शारदाबाई पवार शिक्षणसंस्थेमध्ये पार पडलेल्या वाद्यवादन स्पर्धेमध्ये समर्थ नर्सिंग कॉलेजच्या एकूण तीन विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता आणि उत्कृष्ट ढोलकी व सूरपेटी वाजवून तिसरा क्रमांक पटकावला. यासाठी विद्यार्थ्यांना चषक आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले तसेच श्री. प्रसाद शिंदे (नर्सिंग ट्यूटर) यांनादेखील टीम लीडर म्हणून गौरविण्यात आले.

कोल्हापूर येथील सिद्धगिरी महासंस्थान, कणेरी मठ येथेही ‘स्पंदन २०२५’ महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होत. यामध्ये नृत्य, एकांकिका आणि नाट्य इत्यादी स्पर्धांचा समावेश होता. श्री विनायक ढंगे (असिस्टंट प्रोफेसर) यांच्या मार्गदर्शनाखाली समर्थ नर्सिंग कॉलेजच्या एकूण सव्वीस विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता आणि एकांकिका, मुकनाट्य (माईम)आणि नाट्य सादर केले. त्यांच्या अप्रतिम सादरीकरणाबद्दल त्यांना तिसऱ्या क्रमांकाचा चषक आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल कॉलेजच्या प्राचार्य प्रोफेसर तेजल सुर्वे आणि भ. क.ल. वालावलकर रुग्णालयाच्या संचालिका डॉ. सुवर्णा पाटील यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. या महोत्सवांच्या माध्यमातून नर्सिंग विद्यार्थ्यांना त्यांच्या कलागुणांना वाव देण्याची संधी मिळाली, तसेच विविध आरोग्य शिक्षण संस्थांतील विद्यार्थ्यांमध्ये परस्पर संवाद आणि सहकार्य वाढण्यास मदत झाली.

# ‘एआय’– सक्षम शिक्षणासाठी एसव्हीजेसीटी शाळेचे प्रभावी पाऊल

पारंपरिक अध्यापन पद्धतीला अत्याधुनिक तंत्रज्ञानाची पूरक जोड दिली तर सर्वंकष विकासाकडे विद्यार्थ्यांची वाटचाल झपाट्याने होऊ शकते या हेतूने श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट इंग्रजी माध्यम शाळेने ‘मायलिन’ या पुण्यातील संस्थेच्या सहकार्याने तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (AI) मदतीने शिक्षण अधिक प्रभावी बनवण्याची प्रणाली विकसित केली आहे. शिक्षकांना एआय-आधारित प्रशिक्षण देऊन सक्षम करणे, विद्यार्थ्यांसाठी सक्रिय आणि व्यवहार्य शिक्षणाच्या संधी निर्माण करणे आणि पालकांचा सहभाग वाढवून विद्यार्थ्यांच्या प्रगतीस हातभार लावणे ही तीन मुख्य उद्दिष्टे आहेत. तसेच शाळेचे स्वत:चे शैक्षणिक ॲप विकसित केले असून त्याचे औपचारिक उद्घाटन नुकतेच करण्यात आले. सध्या हे ॲप इयत्ता चौथी, पाचवी, सहावीसाठी कार्यान्वित करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या गणित व इंग्रजी विषयातील मूलभूत क्षमता विकसित करून पाया भक्कम करणे व शैक्षणिक स्तर उंचावण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने विद्यार्थ्यांना नेमक्या न समजलेल्या संकल्पना



*‘मायलिन, पुणे यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांसाठी तयार केलेल्या ॲपचा उद्घाटन समारंभ*

शोधून त्याचे पुनराध्यापन करणे, सराव देणे या हेतूने ही प्रणाली विकसित केली आहे. पालकांना आपल्या पाल्याच्या प्रगतीची, त्याच्या शालेय उपक्रमातील सहभागाची माहिती देण्यासाठी उपयुक्त असे शैक्षणिक ॲप, शाळा व पालक यांच्यातील दुवा ठरणार आहे.

'मायलिन'च्यावतीने शिक्षकांना या प्रणालीची सखोल माहिती व्हावी या उद्देशाने तज्ज्ञांसमवेत द्विदिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. यात ॲपच्या कार्याविषयी सखोल प्रशिक्षण तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून शिक्षकांना देण्यात आले. त्याचप्रमाणे पालकांनाही या ॲपचे प्रशिक्षण देऊन शंकांचे निरसन करण्यात आले. ही कृत्रिम बुद्धिमत्तायुक्त प्रणाली व शैक्षणिक ॲप सुरू केल्याबद्दल पालकांनी शाळेचे विशेष आभार मानले व आपली मुले उपक्रमशील शाळेत शिकत असल्याचा आनंद व्यक्त केला.

प्रशालेच्या संचालिका शरयू यशवंतराव, 'मायलिन'चे संचालक मनोज देशपांडे, मुख्याध्यापिका प्रज्ञा पारकर व जान्हवी चाळके, तज्ज्ञ प्रशिक्षक सोनल थोरवे व त्यांचे सहकारी, इयत्ता चौथी ते सहावीचे पालक यांच्या उपस्थितीत हे शैक्षणिक ॲप सुरू करण्यात आले. सदर उपक्रमासाठी शाळेचे संपर्क शिक्षक यश कापडी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

# मिडवाइफरी सप्ताह २०२५ निमित्त समर्थ नर्सिंग कॉलेजमध्ये विशेष कार्यक्रम



*प्रोफेसर जेस्सी जेकब (H.O.D .OBGY Nursing Department) प्रश्नमंजुषा घेताना*




*इंटरनॅशनल मिडवाईफ डेनिमित्त आयोजित सेमिनारसाठी उपस्थित प्रमुख वक्ते डॉ. अनघा मोडक (HOD, OBGY Department, B.K.L.W. Walawalakar Hospital), समर्थ नर्सिंग कॉलेजच्या प्राचार्य प्रोफेसर तेजल सुर्वे आणि सर्व नर्सिंग फॅकल्टी*

समर्थ नर्सिंग कॉलेज, कासारवाडी येथे 'इंटरनॅशनल मिडवाईफ डे' दि. ५ मे २०२५ रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वर्षीची थीम Midwives : Critical in Every Crisis अशी आहे, जी आरोग्य व्यवस्थेत, विशेषतः संकटांच्या काळात, मिडवाईफची महत्त्वाची भूमिका अधोरेखित करते. या विशेष सप्ताहात माता आणि बाल यांच्या आरोग्याशी संबंधित विविध उपक्रम राबविण्यात आले. या इंटरनॅशनल मिडवाईफ दिनानिमित्त दि. २८ एप्रिल २०२५ रोजी प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता. प्रश्नमंजुषेचे जज म्हणून मिस ज्योती ढगाले (Assistant Professor, OBGY Nursing Department) आणि मिस रुचिरा निवळे (Assistant Professor, Mental Health Nursing Department) यांनी उत्तम कामगिरी निभावली. प्रश्नमंजुषास्पर्धेमध्ये एकूण १२ संघांनी सहभाग घेतला होता. त्यामधून ३ विजेत्या संघांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

त्याचबरोबर दि. ०८ मे २०२५ रोजी सेमिनार सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या सेमिनारमध्ये दोन नामवंत तज्ज्ञांनी आपले विचार मांडले. त्यामध्ये डॉ. अनघा मोडक (HOD, OBGY Department, B.K.L. Walawalkar Hospital and Rural Medical College, ) आणि प्रो. दिव्या के.एम. (HOD, OBGY Nursing, MES College of Nursing, Lote) यांचा समावेश होता. सेमिनार सत्राची सुरुवात पारंपरिक दीपप्रज्वलनाने झाली तसेच समर्थ नर्सिंग कॉलेजच्या प्राचार्या, प्रो. तेजल सुर्वे यांनी प्रमुख वक्त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. मिस आकांक्षा मुळ्ये (नर्सिंग ट्यूटर) यांनी प्रमुख वक्त्यांची ओळख करून दिली आणि सेमिनार सत्र सुरू करण्यात आले.

प्रोफेसर दिव्या के.एम. यांनी Midwives : Critical in Every Crisis या विषयावर व्याख्यान दिले. त्यांनी कोविड महामारी, नैसर्गिक आपत्ती आणि आपत्कालीन परिस्थितीत मिडवाइफ्सची भूमिका किती महत्त्वाची आहे हे उदाहरणांसह स्पष्ट केले.

डॉ. अनघा मोडक यांनी 'Local Initiatives and challenges related to maternal and child health' या विषयावर विचार मांडले. त्यांनी ग्रामीण भागातील गर्भवती महिलांपर्यंत सुविधा पोहोचवताना येणाऱ्या अडचणी, सामुदायिक सहभागाचे महत्त्व आणि निरोगी मातृत्वासाठीच्या उपाययोजना यावर सखोल माहिती दिली.

या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये मिडवाइफ्सच्या कार्याचे महत्त्व अधोरेखित झाले आणि मातृ-स्त्री आरोग्य क्षेत्रातील नवउद्यम व आव्हानांची जाणीव अधिक प्रभावीपणे झाली. कार्यक्रमाचे आयोजन प्रोफेसर जेस्सी जेकब (Professor, OBGY Nursing Department) यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी सहभागी विद्यार्थी आणि वक्त्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. मिडवाइफरी सप्ताहाचे हे आयोजन प्रेरणादायी आणि शैक्षणिकदृष्ट्या समृद्ध करणारे ठरले.

# समर्थ नर्सिंग कॉलेजमध्ये आंतरराष्ट्रीय योगदिन उत्साहात साजरा

योग ही प्राचीन भारतीय परंपरेतून आलेली एक अमूल्य देणगी आहे. शारीरिक, मानसिक आणि आत्मिक स्वास्थ्यासाठी योग अत्यंत प्रभावी साधन मानले जाते. योगामुळे मन:शांती, तणावमुक्ती, एकाग्रता आणि शारीरिक तंदुरुस्ती मिळते.

आंतरराष्ट्रीय योग दिन दरवर्षी २१ जून रोजी साजरा केला जातो. २१ जून हा वर्षातील सर्वात मोठा दिवस असल्याने आणि योगसाधनेसाठी अत्यंत उपयुक्त असा मानला गेल्याने हा दिवस निवडण्यात आला. भारताचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी २०१४मध्ये संयुक्त राष्ट्र संघात (UN) योगदिनाची संकल्पना मांडली आणि १७७ देशांनी त्याला पाठिंबा दिला. त्यानंतर २०१५पासून हा दिवस संपूर्ण जगभरात साजरा केला जात आहे. दर वर्षीप्रमाणे या वर्षीदेखील २१ जून २०२५ रोजी समर्थ नर्सिंग कॉलेज, कासारवाडी यांनी बी. के. एल. वालावलकर रुग्णालय आणि ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व फिजिओथेरपी कॉलेजच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा केला. विद्यार्थ्यांचा व शिक्षकांचा या कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग होता.

कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांचे व इतर मान्यवरांचे स्वागत करून झाली. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मिस तन्वी (योगा प्रशिक्षक) तसेच रुरल मेडिकल कॉलेजचे अधिष्ठाता डॉ. मानसिंगराव घाटगे, फिजिओथेरपी कॉलेजचे प्रोफेसर डॉ. अमर बारवडे, समर्थ नर्सिंग कॉलेजच्या प्राचार्या प्रो. तेजल सुर्वे, इंग्लिश मिडीयम स्कूलच्या प्रिन्सिपल शरयू यशवंतराव, स्पोर्ट्स अकॅडेमीचे प्रमुख श्रीकांत पराडकर आणि सर्व शाखांचे शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. त्यानंतर आंतरराष्ट्रीय योग दिनाचे महत्त्व व २०२५ सालाच्या संकल्पनेची ओळख करून देण्यात आली. एकात्मता व आरोग्याचा संदेश देणारे सामूहिक योगसत्र प्रशिक्षित योग प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले, त्यात उपस्थितांनी एकसाथ योगासने करून दिवसाची सकारात्मक सुरुवात केली.

या सत्रानंतर सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी सादर केलेले भारतनाट्यम् नृत्य, योगाच्या विविध आसनांना तालात गुंफणारे योगनृत्य, व पारंपरिक भारतीय व्यायामकलेचा प्रत्यय देणारे मल्लखांब सादरीकरण हे सर्व कार्यक्रम प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करणारे ठरले. विद्यार्थ्यांनी व प्रमुख पाहुण्यांनी दिलेल्या प्रेरणादायी भाषणांमधून आजच्या धावपळीच्या जीवनात



*योग दिनाच्या कार्यक्रमात सहभागी विद्यार्थी-विद्यार्थिनी*

योगाचे शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक लाभ अधोरेखित करण्यात आले. याशिवाय, योगदिनावर आधारित 'रील्स' स्पर्धा घेण्यात आली होती, त्यात विजेत्यांना प्रमाणपत्रे व बक्षिसे देऊन गौरवण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी झुंबा सत्राचे आयोजन करण्यात आले, त्यात सर्व उपस्थित उत्साहाने सहभागी झाले व या दिवसाचा उत्सव आरोग्य आणि आनंदात साजरा केला. कार्यक्रमाची सांगता समर्थ नर्सिंग कॉलेजच्या शिक्षकांनी दिलेल्या आभारप्रदर्शनाने झाली. त्यांनी कार्यक्रमातील सर्व सहभागी, संयोजक, पाहुणे, विद्यार्थी व सहकार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे आभार मानले. हा संपूर्ण कार्यक्रम योग, आरोग्य, सांस्कृतिक अभिमान व ऐक्य यांचा सुंदर संगम ठरला.

# पाककलेतून आरोग्याचा संदेश



*विविध आहार प्रकारांचे सादरीकरण करताना 'GNM'चे विद्यार्थी आणि शिक्षकवर्ग*

( वृत्त पृष्ठ ११वर)

# समर्थ नर्सिंग कॉलेजमध्ये पोषण कार्यक्रमाचे आयोजन – पाककलेतून आरोग्याचा संदेश

समर्थ नर्सिंग कॉलेज, कासारवाडी येथे १७ व १८ जुलै २०२५ रोजी ‘पोषण पाककला कार्यक्रम’ उत्साहात पार पडला. नर्सिंग अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून विद्यार्थ्यांना आहारशास्त्र हा विषय असतो आणि या विषयांतर्गत हा पाक कलेचा कार्यक्रम साजरा करण्यात येतो. या कार्यक्रमात नर्सिंग विद्यार्थ्यांनी विविध आजारांशी संबंधित आहारप्रकार सादर केले. कार्यक्रमाचा उद्देश रुग्णांमध्ये व जनतेमध्ये पोषणाबाबत जागरूकता वाढवणे व रोगनियंत्रणासाठी योग्य आहाराचे महत्त्व समजावून देणे हा होता. या न्युट्रिशन प्रोग्रॅममध्ये ANM आणि GNMचे विद्यार्थी सहभागी होते. प्रोग्रॅमचे संपूर्ण नियोजन मिस. आकांक्षा मुळ्ये, धनश्री मनवे, निकिता जांभुळकर (नर्सिंग ट्यूटर) यांनी कॉलेजच्या प्राचार्या प्रोफेसर तेजल सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली केले.

कार्यक्रमाचे उद्‌घाटन कॉलेजच्या प्राचार्या प्रोफेसर तेजल सुर्वे यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले, या वेळी इतर सर्व शिक्षकवर्ग उपस्थित होते. या दोन दिवसीय कार्यक्रमात ॲनिमिया आहार, कुपोषण आहार, गर्भवती महिलांचा आहार (ॲण्टिनेटल डायट), लहान मुलांचा पूरक आहार, मधुमेह आहार आणि हृदयविकार प्रतिबंधक आहार अशा विविध प्रकारांचे सादरीकरण करण्यात आले. प्रत्येक ग्रुपमधून एक विद्यार्थ्याने ग्रुपमधील सर्वांची ओळख करून दिली आणि इतर विद्यार्थ्यांनी संबंधित आहार प्रकाराची माहिती दिली, आहाराचे पोषणमूल्य विशद केले आणि प्रत्यक्ष पाककृती तयार करून दाखवल्या. प्रत्येक ग्रुपने आपल्या विषयावर आधारित न्यूट्रिशन चार्ट, प्रदर्शने, व स्वतः तयार केलेल्या पदार्थांचे वितरण केले. या वेळी शिक्षकांनी या उपक्रमाचे कौतुक करत विद्यार्थ्यांची प्रशंसा केली.

त्यानंतर सर्व उपस्थित मंडळींना विद्यार्थ्यांनी बनवलेल्या विविध पदार्थांचा आस्वाद घेण्यासाठी विनंती करण्यात आली आणि प्रत्येकांनी विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट पाककलेबद्दल आपापले मत व्यक्त केले. कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्या तेजल सुर्वे यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी त्यांच्या भाषणात योग्य आहार व पोषणाच्या महत्त्वावर प्रकाश टाकला.

हा कुकरी कार्यक्रम नर्सिंग विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलता, संघभावना आणि पोषणज्ञान वाढवण्याच्या दृष्टिकोनातून अत्यंत यशस्वी ठरला. विद्यार्थ्यांनी विविध पौष्टिक आणि स्वादिष्ट पदार्थ सादर करून आपले कौशल्य सिद्ध केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे, मार्गदर्शक शिक्षकांचे व आयोजकांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढतो व सर्वांगीण विकासास चालना मिळते, असे आयोजकांनी सांगितले.

# महिला खेळाडूंसाठी आरोग्यविषयक मार्गदर्शन शिबिराचे आयोजन




*शिबिरात सहभागी महिला खेळाडू*

डेरवण क्रीडासंकुलात ‘सिम्पली स्पोर्ट फाउंडेशन’ आणि श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टच्या वतीने महिला खेळाडू व प्रशिक्षकांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक २१ ते २३ जुलै या कालावधीत आयोजित केलेल्या या तीन दिवसीय महिला क्रीडा आरोग्य उपक्रमात विविध उपयुक्त सत्रांचे आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये एसव्हीजेसीटी इंग्लिश मिडियम स्कूल व शावजीराव लक्ष्मणराव निकम, फुरुस विद्यालयातील विद्यार्थिनींनी आवर्जून सहभाग नोंदविला होता.

या उपक्रमाकरिता बंगलोरस्थित फिजिओथेरपीस्ट रितिका पारटे, मानसशास्त्रज्ञ वृषाली चौधरी, पोषणतज्ज्ञ शिफ्रा वराडकर या तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. या शिबिरासाठी क्रीडा संचालक श्रीकांत पराडकर, प्रशिक्षक विनायक पवार, प्रतीक्षा पेंढारी, सागर साळवी, अविनाश पवार, शावजीराव लक्ष्मणराव निकम, फुरुस विद्यालयाच्या शिक्षिका मुग्धा टेंबे उपस्थित होते. तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक उदयराज कळंबे यांचेही सहकार्य लाभले.

महिला खेळाडू व प्रशिक्षकांसाठी करण्यात आलेल्या या कार्यशाळेत आरोग्यविषयक अडचणी, पोषणविषयक मार्गदर्शन आणि मानसिक आरोग्य या तीन महत्त्वपूर्ण विषयांवर सखोल

भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र
श्रीक्षेत्र डेरवण – ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : Reception No. (Hospital) : 8847790149 MSW (Social worker) : 9356427731
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

मार्गदर्शन करण्यात आले. अनारोग्यदायी सवयींमुळे होणारे आजार, संसर्ग, वंध्यत्व यांसारख्या समस्यांबद्दल त्यांनी उपस्थित विद्यार्थिनींना जागरूक केले. त्यांनी पर्यावरणपूरक पाळी उत्पादने योग्य पद्धतीने वापरणे व त्याची विल्हेवाट लावणे याबद्दल उत्तम मार्गदर्शन केले. या सत्रांचे उद्दिष्ट महिला खेळाडूंच्या कामगिरीत आणि क्रीडा गुणवत्तेत सकारात्मक बदल घडवणे हे आहे.

शिबिरातील उपस्थित विद्यार्थिनींनी आपले अनुभव, शंका व प्रश्न मोकळेपणाने मांडले. आजच्या बदलत्या क्रीडा क्षेत्रात महिला खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करावी यासाठी त्यांचे संपूर्ण आरोग्य, पोषण आणि मानसिक संतुलन टिकवणे अत्यंत आवश्यक आहे. या उपक्रमामुळे खेळाडू विद्यार्थिनींमध्ये आपल्या शरीराच्या व मानसिकतेच्या बदलांबद्दल वैज्ञानिक दृष्टिकोनाने विचार करण्याची सवय लागेल, असे मनोगत फुरुस हायस्कूलच्या शिक्षिका मुग्धा टेंबे यांनी व्यक्त केले.

# ‘एसव्हीजेसीटी’च्या नेमबाजांची ‘सीबीएसई साऊथ झोन’मध्ये सुवर्ण व रौप्यपदक कमाई

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टच्या डेरवण क्रीडासंकुलातील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शूटिंग रेंजमध्ये सराव करणाऱ्या आणि एसव्हीजेसीटी इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी सीबीएसई साऊथ झोन चॅम्पियनशिपमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. केरळमधील कोलम येथे संपन्न झालेल्या या स्पर्धेमध्ये ६००हून अधिक खेळाडू सहभागी झाले होते. त्यामध्ये एसव्हीजेसीटीच्या सहा खेळाडूंचा सहभाग होता.

या स्पर्धेत हर्ष बागवे याने ‘१० मीटर एअर रायफल’ प्रकारात वैयक्तिक सुवर्णपदक पटकावले. तसेच आरोह वारे, संस्कार शेडगे आणि हर्ष बागवे या त्रिकुटाने ‘सांघिक १० मीटर एअर रायफल’ प्रकारात रौप्यपदक जिंकत नेमबाजी क्षेत्रात आपली छाप पाडली.

या यशामागे खेळाडूंच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांबरोबरच नेमबाजीचे मार्गदर्शन करणारे प्रशिक्षक सागर साळवी तसेच खेळाडूंच्या फिटनेससाठी विशेष मेहनत घेणारे कोचिंग डिव्हिजनचे अविनाश पवार, विनायक पवार आणि प्रतीक्षा पेंढारी यांचे मोलाचे योगदान आहे.

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल खेळाडूंच्या पालकांनी सर्व खेळाडू व प्रशिक्षकांचे अभिनंदन करताना सांगितले की, डेरवण क्रीडा संकुलातील आंतरराष्ट्रीय स्तरावरील सुविधा व दर्जेदार प्रशिक्षणामुळेच आमच्या खेळाडूंनी अल्पावधीत राष्ट्रीय स्तरावर झळकण्याचा मान मिळवला आहे.

या यशामुळे रत्नागिरी जिल्ह्याच्या क्रीडा वर्तुळात आनंदाचे व कौतुकाचे वातावरण असून, नेमबाजी क्षेत्रात एसव्हीजेसिटीचे विद्यार्थी भविष्यात आणखी मोठी कामगिरी करतील असा विश्वास व्यक्त केला जात आहे.


*प्रशिक्षक सागर साळवी, हर्ष बागवे, आरोह वारे आणि संस्कार शेडगे*

**मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक :** श्री. विकास कमलाकर वालावलकर यांनी धनश्री ऑफसेट, ३/२०८, पत्रकार कॉलनी, कुवारबाव, रत्नागिरी येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, डेरवण, पो. सावर्डे, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी ४१५ ६०६ येथून प्रकाशित केले.Visit us at https://swamisamarth.com/dervan// कार्यकारी संपादिका : डॉ. सौ. सुवर्णा पाटील-९९२१२ ५१६९५,उपसंपादक : सौ. शरयू यशवंतराव-९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर-९५८८४ ७९२२०
नोंदणी क्रमांक : MAHMAR/2022/86035